मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दिनांक २२ नोव्हेंबर २०२३। पान १

# अतिक्रमण कारवाईतील जप्त मालाचा गोलमाल

## कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत कनिष्ठ अभियंत्याला निलंबित

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

अतिक्रमण कारवाईत जप्त केलेल्या पाच उद्वाहक (लिफ्ट) मशिन जाणीवपूर्वक पाच महिने दुसरीकडे ठेवल्याने कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत कनिष्ठ अभियंत्याला निलंबित करण्यात आले. त्याची विभागीय चौकशी सुरू करण्याचा आदेश आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिला आहे. संतोष शिरसाठ असे निलंबित केलेल्या कनिष्ठ अभियंत्याचे नाव आहे. शिरसाठ हे 'क' क्षेत्रीय कार्यालयात कार्यरत आहेत. त्यांच्याकडे अतिक्रमण पथकप्रमुखाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. चिखली, मोशीतील अनधिकृत कच्ची, पक्की घरे, पत्राशेड, हातगाड्या, टपऱ्या, पथारीवाले, फळविक्रेत्यां वरील कारवाईसाठी त्यांची नेमणूक होती. शिरसाठ यांनी भोसरी एमआयडीसी येथील एका कंपनीसमोर बऱ्याच वर्षांपासून बेवारसपणे लावलेल्या आणि बंद अवस्थेत असलेल्या पाच लिफ्ट मशिनवर २५ मार्च २०२३ रोजी अतिक्रमण कारवाई केली. हस्तगत केलेल्या मशिन मोशीतील वाहनतळाच्या ठिकाणी जमा करणे आवश्यक असताना जवळपास पाच महिने विलंबाने म्हणजे २७ ऑगस्ट रोजी तक्रारीनंतर अण्णासाहेब मगर स्टेडिअम येथे जमा केल्या. शिरसाठ यांनी कारवाई करताना नियमित सूचनांचे पालन केले नाही. मशिन जाणीवपूर्वक 'क' क्षेत्रीय कार्यालयाच्या आवारात ठेवल्या. याबाबत त्यांनी केलेला खुलासा सयुक्तिक नाही. त्यांच्या गैरवर्तनामुळे कार्यालयीन शिस्तीवर प्रतिकूल परिणाम होऊ शकेल. ते प्रत्यक्ष सेवेत राहिल्यास तपासात अडथळा निर्माण होण्याची भीती आहे. पुराव्यात फेरफार होऊ नये यासाठी शिरसाठ यांना निलंबित करण्यात आले असून, त्यांची विभागीय चौकशी सुरू केली आहे.अतिक्रमण कारवाईत जप्त केलेल्या पाच उद्वाहक (लिफ्ट) मशिन जाणीवपूर्वक पाच महिने दुसरीकडे ठेवल्याने कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत कनिष्ठ अभियंत्याला निलंबित करण्यात आले. त्याची विभागीय चौकशी सुरू करण्याचा आदेश आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिला आहे. संतोष शिरसाठ असे निलंबित केलेल्या कनिष्ठ अभियंत्याचे नाव आहे. शिरसाठ हे 'क' क्षेत्रीय कार्यालयात कार्यरत आहेत. त्यांच्याकडे अतिक्रमण पथकप्रमुखाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. हस्तगत केलेल्या मशिन मोशीतील वाहनतळाच्या ठिकाणी जमा करणे आवश्यक असताना जवळपास पाच महिने विलंबाने म्हणजे २७ ऑगस्ट रोजी तक्रारीनंतर अण्णासाहेब मगर स्टेडिअम येथे जमा केल्या.




### मशिन जाणीवपूर्वक 'क' क्षेत्रीय कार्यालयाच्या आवारात ठेवल्या

» मशिन जाणीवपूर्वक 'क' क्षेत्रीय कार्यालयाच्या आवारात ठेवल्या. याबाबत त्यांनी केलेला खुलासा सयुक्तिक नाही. त्यांच्या गैरवर्तनामुळे कार्यालयीन शिस्तीवर प्रतिकूल परिणाम होऊ शकेल. ते प्रत्यक्ष सेवेत राहिल्यास तपासात अडथळा निर्माण होण्याची भीती आहे. पुराव्यात फेरफार होऊ नये यासाठी शिरसाठ यांना निलंबित करण्यात आले असून, त्यांची विभागीय चौकशी सुरू केली आहे.अतिक्रमण कारवाईत जप्त केलेल्या पाच उद्वाहक (लिफ्ट) मशिन जाणीवपूर्वक पाच महिने दुसरीकडे ठेवल्याने कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत कनिष्ठ अभियंत्याला निलंबित करण्यात आले.

# शहरात वायु प्रदूषण वाढतय ; नागरिक संतप्त

## पिंपरी-चिंचवड शहरात वायुप्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पिंपरी-चिंचवड शहरात वायुप्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे श्वसनासह खोकला व इतर आजार होत आहे. त्यामुळे शहरातील वाढते वायुप्रदूषण कमी करण्यासाठी महापालिकेने योग्य त्या उपायोजना कराव्यात, अशी तक्रारी सोमवारी (दि.२०) झालेल्या जनसंवाद सभेत नागरिकांनी केल्या. महापालिकेच्या सर्व ८ क्षेत्रीय कार्यालयांत सोमवारी जनसंवाद सभा झाली. त्यात ५८ नागरिकांनी सहभाग घेतला.

वाहनांमुळे तसेच, बांधकाम, खोदकाम, खाणकाम, कचरा जाळणे आदींमुळे वायुप्रदूषण वाढत आहे. हिवाळ्यामुळे दूषित हवा वर जात नसल्याने प्रदूषणात भर पडत आहे. प्रदूषण वाढल्याने नागरिकांना



श्वसनाचे आजार होत आहेत. तसेच, खोकला, कफ व इतर आजारांचे रुग्ण वाढत आहेत. विशेषत: वयोवृद्ध व लहान मुलांना आजार होण्याची प्रमाण अधिक आहे. हे प्रदूषण कमी करण्यासाठी महापालिकेने उपायोजना कराव्यात, अशी तक्रार नागरिकांनी केली. तसेच, शहरातील वाढत्या रहदारीमुळे सर्वच चौकांत वाहतूक कोंडी होत आहे. तर, काही रस्त्यांवर वाहतूक संथ होते. भटक्या व मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा. उघड्यावर कचरा टाकणार्यांवर दंडात्मक कारवाई करावी. रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम वेगाने करावे. शहर परिसरात वेळोवेळी किटक फवारणी करण्यात यावी, अशा तक्रारीही नागरिकांनी केल्या. सभेच्या अध्यक्षस्थानी अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, सहआयुक्त चंद्रकांत इंदलकर, मुख्य अभियंता श्रीकांत सवणे, सहशहर अभियंता मनोज सेठीया, संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, उपायुक्त अजय चारठाणकर, सहायक आयुक्त विजयकुमार सरनाईक हे होते. या वेळी क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, अमित पंडित, अण्णा बोदडे, किरण मोरे, राजेश आगळे, सीताराम बहुरे, उमेश ढाकणे व अधिकारी उपस्थित होते.

# रिंग रोडसाठी हवेली-मावळमधून सर्वाधिक भूसंपादन

## सुमारे १७४० हेक्टर संपादित करावी लागणार

**पिंपरी । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी रस्ते विकास महामंडळाकडून करण्यात येणाऱ्या रिंग रोडसाठी हवेली आणि मावळ तालुक्यात सर्वाधिक भूसंपादन झाले आहे. या रिंगरोडसाठी सुमारे १६०० एकरचे निवाडे जाहीर झाले आहेत. त्यासाठी आतापर्यंत सुमारे १७२० कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे.

त्यामुळे पूर्व भागातील रिंगरोडसाठी गती येण्याची चिन्हे आहेत. पुणे आणि पिंपरी चिंचवड शहराभोवतीचा रिंगरोड हा मावळ, खेड, हवेली, भोर आणि पुरंदर या पाच तालुक्यांमधून जाणार आहे. या रिंगरोडसाठी पश्चिम भागातून ३४ आणि पूर्व भागातील ४६ गावांमधील सुमारे १७४० हेक्टर संपादित करावी लागणार आहे. पूर्व भागातून ८८५ हेक्टर आणि पश्चिम भागातील ७१६ हेक्टर जमीन संपादित करण्यात येणार आहे. पश्चिम भागातील रिंगरोडची रचना बदलल्याने तीन गावांची भूसंपादन प्रक्रिया प्रलंबित आहेत. त्यात मुळशी तालुक्यातील कासार आंबोली, हवेली तालुक्यातील प्रयागधाम आणि भोर तालुक्यातील खोपी या गावांचा समावेश आहे. रिंगरोडसाठी पश्चिम भागातील सुमारे ६३० हेक्टरचे निवाडे जाहीर करण्यात आले आहेत. त्यापैकी संमतीने २६० हेक्टर तसेच सक्तीने ३७० हेक्टर क्षेत्राचे निवाडे जाहीर करण्यात आले आहेत. संमतीने २६० हेक्टर क्षेत्र ताब्यात आले आहे. त्यामुळे ६३० हेक्टर क्षेत्राचे म्हणजेच सुमारे १६०० एकर क्षेत्राचे भूसंपादन झाल्याचे मानले जात आहे. त्यामुळे रिंग रोडच्या पुढच्या प्रक्रियेला गती येण्याची चिन्हे आहेत. ६३० हेक्टरसाठी जिल्हा प्रशासनाने




> **“ पुणे शहराभोवतीचा रिंगरोडसाठी जिल्हा प्रशासनाने ६३० हेक्टर म्हणजेच सुमारे १६०० एकर जमीन संपादनाचे निवाडे जाहीर केले आहेत. त्यात २७० हेक्टर हे संमतीने संपादित करण्यात आले आहेत. तर ३७० हेक्टर विनासंमतीने संपादित करण्यात येणार असून त्याचे निवाडे जाहीर करण्यात आले आहे. - डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी**

आतापर्यंत १७२० कोटी रुपयांचा निधी वाटप केला आहे. पूर्व रिंगरोडसाठी ४८ गावांमधील जागा संपादित करण्यात येणार आहे. मावळमधील ११, खेडगावमधील १२, हवेलीतील १५ आणि पुरंदर तालुक्यातील ७ आणि भोरमधील तीन अशा गावांमधून जात आहे. त्यापैकी खेडमधील १२ आणि हवेली तालुक्यातील चार अशा १६ गावांचे निवाडे जाहीर करण्यात आले आहेत. त्या गावांच्या अंतिम निवाड्याद्वारे ३९७.१६ हेक्टर जागेचे निवाडे जाहीर केल्याने त्या जागेचे संपादन केले जाणार आहे. पश्चिम भागातील सोळाशे एकर जमिनीचे निवाडे जाहीर झाल्याने पूर्व भागातील भूसंपादनालाही आता गती येण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. रिंगरोडसाठी पश्चिम भागातील हवेली आणि मावळ तालुक्याने भूसंपादनात आघाडी घेतली आहे. हवेली तालुक्यात पश्चिमसाठी २१४ हेक्टर क्षेत्राचे संपादन करावे लागणार आहे. त्यापैकी १०८ हेक्टरचे संपादन झाले आहे. तर मावळ तालुक्यात १२० हेक्टरपैकी ६७ हेक्टरचे संपादन झाले आहे. त्यामुळे संपादनाच्या तुलनेत मावळ तालुक्यात ५५ टक्के तर हवेली तालुक्यात ५० टक्के संपादन झाल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे भूसंपादनासाठी मावळ, हवेली तालुक्याने आघाडी घेतल्याचे दिसून आले आहे.

# अमूल क्लिन फ्युएल कार रॅलीला खेडमध्ये प्रारंभ!

## रॅलीचा २६ नोव्हेंबरला आणंद येथे होणार समारोप

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** येत्या २६ नोव्हेंबरला राष्ट्रीय दुध दिन साजरा करण्यानिमित्त आयोजित अमूल क्लिन फ्युएल बायोसीएनजी कार रॅलीला आज पुण्यातून झेंडा दाखवून प्रारंभ झाला. या रॅलीमध्ये १२ बायोसीएनजी कार सहभागी असून मुंबई आणि गुजरातमधील अनेक शहरांतून मार्गस्थ होत रॅलीचा येत्या २६ नोव्हेंबरला आणंद येथे समारोप होणार आहे. भारताचे दुग्धपुरूष असलेल्या डॉ. वर्गीस कुरियन यांच्या जयंतीदिनाचे म्हणजेच राष्ट्रीय दुध दिनाचे (नॅशनल मिल्क डे) औचित्य साधून हा उपक्रम साजरा




केला जात आहे. देशातील दुग्धोत्पादन क्रांतीचा पुरावा आणि चक्रीय अर्थव्यवस्था व शाश्वत शेती यांप्रतीची कटिबद्धता असलेल्या या रॅलीचा प्रारंभ गुजरात को-ऑपरेटिव्ह मिल्क मार्केटिंग फेडरेशनचे व्यवस्थापकीय संचालक जयेन मेहता यांच्या हस्ते झेंडा दाखवून झाला. अमूल फेडरेशन, मारुती सुझूकी इंडिया या संस्थांतील मान्यवर तसेच डॉ. वर्गीस कुरियन यांच्या कन्या निर्मला कुरियन याप्रसंगी उपस्थित होते. रॅलीच्या शुभारंभ कार्यक्रमात बोलताना श्री. मेहता म्हणाले, अमूल क्लिन फ्युएल बायोसीएनजी रॅलीसाठी मारुती सुझूकीशी सहयोग करताना आम्ही हर्षोत्सुक आहोत. गाईच्या शेणाचे बायोगॅसमध्ये रुपांतर, दुग्धोत्पादन अधिक पर्यावरणपूरक व शाश्वत बनवणे आणि दुग्धोत्पादक शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचा नवा स्रोत निर्माण करणे अशा नव्या क्रांतीच्या लाभाचा गौरव व प्रसार करण्याचे उद्दिष्ट्य या सहयोगामागे आहे. भारतातील सर्वाधिक विश्वसनीय खाद्य ब्रँड असलेला अमूल व भारतातील सर्वाधिक वहन होणारा कार ब्रँड मारुती सुझूकी एकत्रितपणे शाश्वत शेती आणि दुग्धोत्पादन क्रांतीचा संदेश जगाच्या काना-कोपऱ्यात पोचवतील.

### ४ बायो-सीएनजी प्रकल्प?

**» टीईआरआयच्या संशोधनानुसार पेट्रोल वाहने, इलेक्ट्रिक वाहने व बायो-सीएनजी वाहने यांच्या प्रति किलोमीटर वाहनात कार्बन डाय ऑक्साईड उत्सर्जनाचे प्रमाण अनुक्रमे १८४ ग्रॅम, १५० ग्रॅम व -१,०९७ ग्रॅम इतके आहे. यावरुनच बायो-सीएनजी हे सर्वोत्कृष्ट कमी कार्बन असलेले व पर्यावरणात शून्य कार्बन उत्सर्जन करणारे इंधन असल्याचे स्पष्ट होते. सुझूकी कंपनी बायो-सीएनजी इंधनाचा प्रचार करत असून अमूल संलग्न डेअरीसमवेत ४ बायो-सीएनजी प्रकल्प स्थापन करण्याची योजना आखत आहे.**

# जलमापकास विरोध केल्यास कारवाई!

## पोलीस कारवाई करण्याची प्रक्रिया महापालिका प्रशासनाकडून सुरू

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** महत्वाकांक्षी समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत जलमापक बसविण्यास शहरात विरोध होत आहे. मात्र, आता विरोध करणाऱ्यांवर थेट पोलीस कारवाई करण्याची प्रक्रिया महापालिका प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे आता जलमापक बसविण्यास विरोध करणे नागरिक, गृहनिर्माण सोसायट्यांना महागात पडणार आहे. शहराला समन्यायी पद्धतीने पाणीपुरवठा व्हावा, पाणी वितरणातील त्रुटी दूर व्हाव्यात, यासाठी महापालिकेने समान पाणीपुरवठा योजना हाती घेतली आहे. या योजनेची कामे तीन टप्प्यांत सुरू असून, नव्याने १८०० किलोमीटर लांबीच्या जलवाहिन्या टाकणे, तसेच जुन्या आणि जीर्ण जलवाहिन्यांची दुरुस्ती, निवासी आणि व्यावसायिक मिळकतींना जलमापक बसविणे आणि साठवणूक टाक्यांची उभारणी करणे, अशा तीन टप्प्यांत ही कामे समांतर पद्धतीने सुरू आहेत. महापालिकेकडून समान पाणीपुरवठा योजनेचे काम सन २०१७ मध्ये सुरू केले. आतापर्यंत ६२ टक्के काम पूर्ण झाले आहे. या योजनेतून सोसायट्या, बंगल्यांमध्ये तीन लाख १८ हजार जलमापक बसविण्यात येणार आहेत. ज्या भागातील पाणी पुरवठा वितरणाच्या यंत्रणेचे काम पूर्ण झाले आहे, अशा सोसायट्या, बंगल्यांना जलमापक बसविण्याचे काम सुरू असून, आतापर्यंत एक लाख ३४ हजार ५८० जलमापक बसविण्यात आले आहेत. सध्या शहराचा मध्यवर्ती भाग, सहकारनगर, पर्वती, कात्रज, धनकवडी, सिंहगड रस्ता, शिवाजीनगर, कोथरूड, कर्वेनगर, वारजे आदी या भागात जलमापक बसविण्याचे काम सुरू आहे. त्यामध्ये मध्यवर्ती भाग, सहकारनगर, कात्रज भागात जलमापक बसविण्याच्या कामास राजकीय पक्षांचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते विरोध करत आहेत. याशिवाय गृहनिर्माण सोसायट्यांचे पदाधिकारीही विरोध करत आहेत. पाणीपुरवठा विभागाने योजनेबाबत माहिती देऊनही विरोध होत असल्याचे निदर्शनास येत आहे. या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी पोलिसांकडे तक्रार करण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, समान पाणीपुरवठा योजनेचे ४० विभागांतील बहुतांश काम पूर्ण झाले आहे. तेथे जलमापक बसविण्यासह किरकोळ कामे बाकी आहेत. पण काही नागरिक जलमापक बसविण्यास विरोध करत आहेत. त्यामुळे त्यांच्याविरोधात पोलीस तक्रार करण्यात येणार असल्याचे पाणीपुरवठा विभागाने सोमवारी स्पष्ट केले.



### समान पाणीपुरवठा योजना

**» मात्र, आता विरोध करणाऱ्यांवर थेट पोलीस कारवाई करण्याची प्रक्रिया महापालिका प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे आता जलमापक बसविण्यास विरोध करणे नागरिक, गृहनिर्माण सोसायट्यांना महागात पडणार आहे. शहराला समन्यायी पद्धतीने पाणीपुरवठा व्हावा, पाणी वितरणातील त्रुटी दूर व्हाव्यात, यासाठी महापालिकेने समान पाणीपुरवठा योजना हाती घेतली आहे. या योजनेची कामे तीन टप्प्यांत सुरू असून, नव्याने १८०० किलोमीटर लांबीच्या जलवाहिन्या टाकणे, तसेच जुन्या आणि जीर्ण जलवाहिन्यांची दुरुस्ती, निवासी आणि व्यावसायिक मिळकतींना जलमापक बसविणे आणि साठवणूक टाक्यांची उभारणी करणे, अशा तीन टप्प्यांत ही कामे समांतर पद्धतीने सुरू आहेत.**

# आळंदी : इंद्रायणी नदी पात्रात उतरून आंदोलन

## नदीतील जल प्रदूषणावर सामाजिक संस्था आक्रमक

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** इंद्रायणी जल प्रदूषणावरून सामाजिक संस्था आक्रमक झाल्या आहेत. इंद्रायणी नदीमध्ये उतरून मानवी हक्क संरक्षण संस्थेच्या वतीने तोंडावर काळ्या पट्ट्या बांधून मूक आंदोलन करण्यात आले. रासायनिक पाणी सोडणाऱ्या आस्थापनांवर फौजदारी कारवाई करण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली आहे. वारकरी आणि भाविकांच्या भावनेशी हे सरकार खेळत आहेत. वारकऱ्यांच्या आरोग्याशी खेळ खेळला जात आहे, असे मत मानवी हक्क संरक्षण संस्थेने व्यक्त केले. मानवी हक्क संरक्षण आणि जागृतीच्या वतीने प्रदूषीत इंद्रायणी नदीमध्ये तोंडाला काळ्या पट्ट्या बांधून आंदोलन करण्यात आले. आळंदीत माऊलींच्या संजीवन समाधीच्या दर्शनासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातुन वारकरी दाखल होतात. पवित्र नदी इंद्रायणीमध्ये स्नान करतात. मात्र, सध्याची परिस्थिती अत्यंत विदारक आहे. इंद्रायणीचा श्वास गुदमरतो आहे. मोठ्या प्रमाणावर जल प्रदूषण होत आहे. पिंपरी- चिंचवड भागातील रसायनयुक्त प्रक्रिया न केलेले पाणी सोडले जात असल्यामुळे इंद्रायणीत जल प्रदूषण होत आहे, असा आरोप संस्थेच्या वतीने करण्यात आला. लाखो वारकऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. पिंपरी- चिंचवड महानगर पालिकेला आणि आळंदी नगरपरिषदेला खडबडून जागे करण्यासाठी सामाजिक संस्था यांच्याकडून मूक आंदोलन करण्यात आले. इंद्रायणीत रासायनिक पाणी सोडणाऱ्या व्यक्तींवर फौजदारी कारवाई करण्यात यावी अशी मागणी देखील करण्यात आली आहे.




### इंद्रायणीचा श्वास गुदमरतो आहे

**» वारकरी आणि भाविकांच्या भावनेशी हे सरकार खेळत आहेत. वारकऱ्यांच्या आरोग्याशी खेळ खेळला जात आहे, असे मत मानवी हक्क संरक्षण संस्थेने व्यक्त केले. मानवी हक्क संरक्षण आणि जागृतीच्या वतीने प्रदूषीत इंद्रायणी नदीमध्ये तोंडाला काळ्या पट्ट्या बांधून आंदोलन करण्यात आले. आळंदीत माऊलींच्या संजीवन समाधीच्या दर्शनासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातुन वारकरी दाखल होतात. पवित्र नदी इंद्रायणीमध्ये स्नान करतात. मात्र, सध्याची परिस्थिती अत्यंत विदारक आहे. इंद्रायणीचा श्वास गुदमरतो आहे. मोठ्या प्रमाणावर जल प्रदूषण होत आहे. पिंपरी- चिंचवड भागातील रसायनयुक्त प्रक्रिया न केलेले पाणी सोडले जात असल्यामुळे इंद्रायणीत जल प्रदूषण होत आहे, असा आरोप संस्थेच्या वतीने करण्यात आला.**

# चंद्रकांत वाघमोडे यांचे उपोषण मागे

## धनगर समाजाला एसटी मधून आरक्षण मिळावे : वाघमोडे



**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

बारामतीत सुरू असलेले चंद्रकांत वाघमोडे यांनी उपोषण मागे घेतलं आहे. धनगर समाजाला एसटी मधून आरक्षण मिळावे या मागणीसाठी त्यांनी उपोषण केलं होतं. तेराव्या दिवशी चंद्रकांत वाघमोडे (उहरपवॲरझरपीं थरसहोवश) यांनी उपोषण मागे घेतलं आहे.मंत्री अतुल सावे यांचा निरोप घेऊन प्रशासनाचे अधिकारी यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर खंडेराव कोकरे यांच्या हस्ते उपोषण सोडण्यात आलं. बारामतीतील प्रशासकीय भावनाबाहेर उपोषण सुरू होते. गेली तेरा दिवसांपासून आरक्षणाकडे सरकारने पाठ फिरवल्याने आंदोलन आक्रमक झाले होते. राज्य सरकारने धनगर आरक्षणासाठी एक कमिटी गठीत करून या कमिटीचा अहवाल आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे परिपत्रक जारी केले. आज चंद्रकांत वाघमोडे यांना मंत्री गिरीश महाजन यांनी लेखी पत्र दिले आहे.

उपोषणकर्ते वाघमोडे आणि माजी खासदार डॉ. विकास महात्मे यांच्यात चर्चा झाली. त्यानंतर हे उपोषण अखेर मागे घेण्यात आले आहे. उपोषण सोडताना वाघमोडे म्हणाले की, चार राज्याच्या आरक्षणाचा अभ्यास करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीत धनगर समाजातील नऊ जणांचा समावेश आहे. या समितीत ९ जणांच्या समावेश करण्यासाठी हे उपोषण नसून धनगर समाजाला एसटीमधून आरक्षण मिळावं, यासाठी हे उपोषण होतं. माजी खासदार डॉ. विकास महात्मे यांच्या माध्यमातून मंत्री अतुल सावे यांच्याशी चर्चा केली त्यावेळी त्यांना मुख्यमंत्र्यांशी बैठकीचं नियोजन करुन देण्याची मागणी केली. सावेंनी ही मागणी मंजूर केली त्यामुळे आज उपोषण मागे घेतलं असल्याचं चंद्रकांत वाघमोडे यांनी उपोषण सोडताना सांगितलं आहे. या उपोषणाच्या माध्यमातून सरकारचं लक्ष वेधण्याचा प्रयत्न वाघमोडे यांनी केला होता. राज्यातील सगळ्या आमदार आणि खासदार यांच्या घराबाहेर आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी धनगर समाजाच्या नागरिकांना दिला होता. त्यानुसार बारामतीतील अजित पवारांच्या घराबाहेर धनगर समाजाने आंदोलन केलं होतं. सोबतच काही ठिकाणी रास्तारोको करत सरकारचं लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न केला होता. धनगर समाजाला एसटीमधून आरक्षण मिळावं या मागणीसाठी चंद्रकांत वाघमोडे उपोषणाला बसलेले होते. बारामतीतील प्रशासकीय भावना बाहेर चंद्रकांत वाघमोडे यांचं उपोषण सुरू होतं. यापूर्वी पुण्याचे जिल्हाधिकारी डॉक्टर राजेश देशमुख व पोलीस अधीक्षक अंकित गोयल यांनी भेट दिली होती. उपोषण मागे घेण्याची विनंती केली परंतु जोपर्यंत मुख्यमंत्री किंवा त्यांचे प्रतिनिधी म्हणून श्रीकांत शिंदे येत नाहीत तोपर्यंत उपोषण मागे घेणार नाही, असा पवित्रा चंद्रकांत वाघमोडे यांनी घेतला होता.सरकारने ५० दिवसात काय केलं?, हे मला मुख्यमंत्र्यांना विचारायचं आहे शासनाचे प्रतिनिधी याचे उत्तर देऊ शकणार नाहीत. याचे उत्तर हे मुख्यमंत्री देऊ शकतील म्हणून मुख्यमंत्र्यांनी इथे यावं किंवा त्यांचे प्रतिनिधी म्हणून श्रीकांत शिंदे यांना पाठवावं, अशी मागणी उपोषणकर्ते चंद्रकांत वाघमोडे यांनी केली होती.

### सरकारचं लक्ष वेधण्याचा प्रयत्न

**» उपोषण सोडताना वाघमोडे म्हणाले की, चार राज्याच्या आरक्षणाचा अभ्यास करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीत धनगर समाजातील नऊ जणांचा समावेश आहे. या समितीत ९ जणांच्या समावेश करण्यासाठी हे उपोषण नसून धनगर समाजाला एसटीमधून आरक्षण मिळावं, यासाठी हे उपोषण होतं. माजी खासदार डॉ. विकास महात्मे यांच्या माध्यमातून मंत्री अतुल सावे यांच्याशी चर्चा केली त्यावेळी त्यांना मुख्यमंत्र्यांशी बैठकीचं नियोजन करुन देण्याची मागणी केली. सावेंनी ही मागणी मंजूर केली.**

# डॉक्टरनंतर आता कारागृह प्रशासनावर संशयाची सुई

## येरवडा कारागृहाचे प्रशासन ललित पाटील प्रकरणात संशयाच्या भोवऱ्यात




**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

ड्रग्स माफिया ललित पाटीलला मदत करण्यात येरवडा कारागृह प्रशासन देखील सहभागी असल्याचं समोर आलं आहे. कारण येरवडा कारागृहाच्या चीफ मेडिकल ऑफिसरने लिहिलेलं एक पत्र एबीपी माझाच्या हाती लागलंय. तीन जून २०२३ च हे पत्र ससून रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांना उद्देशून लिहण्यात आलं आहे. या पत्रात उघड झालेल्या माहितीमुळे मोठी खळबळ उडाली आहे तर अनेकांचे धाबे दणाणले आहे. या पत्रात येरवडा कारागृहाचे वैद्यकीय अधीक्षक ललित पाटीलला उपचारासाठी ससून रुग्णालयात भरती करून घेण्याची आणि किमान १५ दिवस त्याला तिथंच ठेवण्याची विनंती करत आहेत. त्यासाठी ललित पाटीलला ससून रुग्णालयातून पुन्हा येरवडा कारागृहात नेण्यासाठी एस्कॉर्ट उपलब्ध नसल्याच कारण येरवडा कारागृह प्रशासनाकडून देण्यात आलंय. या पत्रच्या माध्यमातून ललित पाटीलला येरवजा कारागृहातील प्रशसन मदत करत असल्याची धक्कादायक माहिती उघड झाली आहे. आधी पोलीस , त्यानंतर ससून रुग्णालयातील डॉक्टर आणि आता येरवडा कारागृहाचे प्रशासन ललित पाटील प्रकरणात संशयाच्या भोवऱ्यात सापडलंय. ३ जून २०२३ ला लिहिलेल्या या पत्रामध्ये ललित पाटीलला ससून रुग्णालयात भरती करून घेण्याची आणि किमान १५ दिवस तिथेच ठेवण्याची विनंती करण्यात आली आहे. ससून रुग्णालयातून पुन्हा येरवडा कारागृहात ने-आण करण्यासाठी एस्कॉर्ट म्हणजे वाहनांचा प्रश्न असल्याच कारण त्यासाठी देण्यात आलं आहे. तर येरवडा कारागृहाच्या चीफ मेडिकल ऑफिसरने ससून रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांना लिहिलेले हे पत्र असून या पत्रावर येरवडा कारागृहाच्या कारागृह अधीक्षकांची सही देखील आहे. ऑक्टोबर २०२० मध्ये चाकण पोलिसांनी मेफेड्रोन तयार करून त्याची विक्री करणारी टोळी अटक केली. यातील ललित पाटील आणि अरविंद लोहारे या दोन आरोपींनी येरवडा कारागृहात बंद असतानाच नाशिकमध्ये पुन्हा मेफेड्रोनचा कारखाना सुरु करायचं ठरवलं, अशी माहिती पुणे पोलिसांनी न्यायालयात दिली. एबीपी माझाच्या हाती लागलेलं हे पत्र पोलिसांच्या या माहितीला पुष्टी देणारं आहे. कारण येरवडा कारागृहातील काही कर्मचाऱ्यांना हाताशी धरून ललित पाटीलला मोबाईल फोनवर बोलण्याची संधी उपलब्ध होत होती. त्यांनाच हाताशी धरून ललित पाटीलने स्वत:ची रवानगी ससून रुग्णालयात करून घेतली.